# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No: CGRF /AZ/AUR / 168 / 2009 / 02 Date :-

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri A Abdulla,
House No. 1-16-63, Juna Bazar,Aurangabad.
(Con. No.490010405481 )

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri A Abdulla, House No. 1-16-63, Juna Bazar,Aurangabad.

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **20.01.2009 at 11.00 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**

Shri A Abdulla,
House No. 1-16-63,
Juna Bazar, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६८/२००९/०२**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०२/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- ०७/०२/२००९**

**श्री ए. अब्दुल्ला,**
**घर नंबर १-१६-६३,**
**जुना बाजार,मालीवाडा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०४०५४८१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २०/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांनी मालीवाडा गल्ली, जुनाबाजार येथे घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. ते परदेशात असतांना व विजेचा वापर नसतांना डिसेंबर २००७ मध्ये त्यांचे मीटर बदलण्यात आले. त्यानंतर एप्रिल २००८ पर्यत त्यांना १२९ युनीट सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले. मे २००८ मध्ये ६२७ युनीट तसेच जुन २००८ मध्ये ७२९ युनीट वीज वापराचे बिल देण्यात आले.या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी ०८/०८/२००८ तसेच १७/१०/२००८ रोजी केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल महावितरणच्या संबंधीत विभागाने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस व्याज व दंड न लावता सुधारीत वीज बिल देण्याचे आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २०/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदारा श्री ए.अब्दुल्ला तसेच महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते. त्यांनी अर्जदारास देण्यात आलेले बिल चुकीचे असल्याचे मान्य करीत बिल रिव्हीजन करून ९६५.७९/-रूपये रक्कम क्रेडीट देण्याची तयारी दर्शवीली. मंचाने महावितरण तर्फे अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलाची पाहणी करून व ते मीटरवरील नोंदी प्रमाणे व अर्जदाराच्या प्रत्यक्ष वापराप्रमाणे नसल्याचे आढळल्यामुळे मंचाने अर्जदाराची वीज, त्याच्या तक्रारीचे निवारण होई पर्यत खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश पारीत केला.

३) दिनांक २७/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणी अर्जदार व महावितरण चे नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या काळात अर्जदारास देण्यात आलेले बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला. त्यांनी दाखल केलेल्या बिल रिव्हीजन प्रस्तावात व्याज व दंड आकारणी बाबत मंचाने विचारना केली असता ते कमी करण्यात आले नसल्याचे पण ते कमी करून अर्जदारास रूपये १०७३.६१/-क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली नोडल अधिकारी यांनी दिलेल्या बिल रिव्हीजन प्रस्तावाची एक प्रत ग्राहकास देण्यात आली ग्राहकाने बिल रिव्हीजन मान्य असल्याचे सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या बिल रिव्हीजन प्रस्तावाची पाहणी केल्यावर अर्जदारास व्याज व दंड कमी करून देण्यात आलेले रूपये १०७३.६१/-चे क्रेडिट रक्कम योग्य असल्याचे दिसुन येते.

अर्जदार व महावितरण कंपनी यांच्यात हे प्रकरण तडजोडीने मिटल्यामुळे हे प्रकरण निकाली काढत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६८/२००९/०२** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री ए. अब्दुल्ला,**
**घर नंबर १-१६-६३,**
**जुना बाजार,मालीवाडा,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६८/२००९/०२ )

आपण दिनांक ०२/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**